जा.क्र. मनपा/नर/3८६६/२०१८-२० दि. ५४/१३/२०१८

29) यापूर्वी पत्र क्र. ______________________ दि.________ अन्वये यासोबतच्या मंजूर रेखांकनात प्रस्तावित केलेल्या इमारतीचे बांधकाम खालीलप्रमाणे मर्यादीत ठेवून त्यानुसार कार्यान्वीत करणे बंधनकारक राहिल.

| अ.क्र. | इमारतीचे नांव / प्रकार | संख्या | तळ + मजले | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| 1 | भूखंड अे<br>2 | 1 | पार्ट तळ + पोडियम + 2 ते 4 | 1198.28 |
| 2 | 3 | 1 | लोअर तळ + पार्ट तळ + पोडियम + 2 ते 20 | 5289.96 |
| 3 | 4 | 1 | पार्ट तळ + पोडियम + 2 ते 20 | 5289.96 |
| | | | एकूण | 11778.20 चौ.मी. |
| 4 | भूखंड बी<br>1 | 1 | पार्ट तळ + 14 | 3028.17 |
| 5 | 2 | 1 | स्टिल्ट + 14 | 3305.64 |
| | | | एकूण | 6333.81 चौ.मी. |
| 6 | भूखंड सी<br>1 | 1 | पार्ट तळ + पार्ट 7 | 1894.82 |

30) यापूर्वी पत्र क्र. मिभा/मनपा/नर/5342/2015-16, दि.19/03/2016 अन्वये देण्यात आलेली मंजूरी रद्द करण्यात येत आहे.

31) जागेवर रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था करणे तसेच त्याबाबतची यंत्रणा स्वतंत्र ओव्हरटँक व प्लंबींग लाईनसह कार्यान्वीत ठेवणे व त्याबाबत पाणीपुरवठा विभागाकडील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

32) प्रस्तावित इमारतीसाठी भोगवटा दाखल्यापूर्वी प्रती सदनिका 100 लिटर या क्षमतेची सौर उर्जा वृत्तिल पाणी गरम करण्याची व्यवस्था (सोलार वॉटर हिटींग सिस्टीम) बसवून कार्यान्वीत करणे व त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

33) भोगवटा दाखल्यापुर्वी सदर वृक्ष प्राधिकरणाच्या सल्ल्याप्रमाणे भूखंडामध्ये प्रती 100 चौ.मी. करिता दोन झाडे याप्रमाणे तसेच आर.जी. च्या भूखंडामध्ये प्रती 100 चौ.मी. करिता पाच झाडांची लागवड करुन त्याबाबत वृक्ष प्राधिकरण विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

34) भोगवटा दाखल्यापूर्वी अग्निशमन विभागाकडील तात्पूरता नाहरकत दाखल्यामधील अटीशर्तीची पूर्तता करुन अंतिम नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

35) प्रस्तावित इमारत क्र. 1 (भूखंड सी) करिता जोत्याच्या दाखल्यापुर्वी महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाकडील सुधारीत नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

36) प्रस्तावाखालील जागेतील इमारत क्र. 1 (भूखंड सी) व इमारत क्र. 2 (भूखंड अे) मंजूर रेखांकनामध्ये दर्शविलेले इमारतीमध्ये यु.एल.सी. विभागाकडील कलम 20 खालील आदेशाच्या अनुषंगाने नमुद सदनिका हस्तांतरीत करणे बंधनकारक राहिल. तसेच सदर सदनिकेची विक्री व अन्य व्यवहार संबंधीत विकासकास करता येणार नाही.

37) भोगवटा दाखल्यापुर्वी भूखंड सी मधील इमारत क्र. 1 मधील पहिला व सातवा मजल्यातील प्रत्येकी 1 अशा एकूण 2 सदनिका (बांधकाम क्षेत्र 106.76 चौ.मी.) मंजूर नकाशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस नोंदणीकृत करारनाम्याने विनामुल्य हस्तांतरीत करणे बंधनकारक राहिल.

38) भूखंड अे मधील इमारत क्र. 3 चे विकास योजना रस्त्यासमोरील सामासिक अंतरातील विद्यमान बांधकाम तोडून रस्त्याच्या पुढील बाजूने 4.50 मी. (Revas Projection पासून 3.30 मी.) सामासिक अंतर उपलब्ध करुन देणे विकासकावर बंधनकारक राहिल.

